# जिल्हा परिषद अमरावती

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१

दूरध्वनी क्रमांक - २६६२९२६ ई मेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in

वेबसाईट - www.zpamravati.gov.in


**आदेश**

क्रमांक जिप/मुकाअ/ ५३ /स्वीस/2017

दिनांक 10 मे, 2017

संदर्भ - श्री. मयंक चौधरी, जिल्हा स्वच्छ भारत प्रेरक यांची अमरावती जिल्हयातकरिता झालेली नियुक्ती...

संदर्भीय आदेशान्वये श्री. मयंक चौधरी,यांची अमरावती जिल्हयासाठी जिल्हा स्वच्छ भारत प्रेरक म्हणून नियुक्ती झाल्याप्रमाणे आज दिनांक 10.5.2017 रोजी त्यांचे कामकाजाबाबत चर्चा झाली. सुरुवातीला जिल्हयाची माहिती त्यांनी समजुन घेतल्याचे दिसून आले.

सदर प्रेरक हे हिन्दी भाषीक असून अमरावती जिल्यातील स्वच्छ भारत मिशनचे बाबतीत मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यात कामगिरीच्यादृष्टीने मागे पडल्याचे चित्र आहे. त्यामुळे त्या भागात काम करण्यासाठी त्यांची सेवा उपयुक्त ठरेल. मेळघाटातील कामकाजाचे स्वरुप व स्वच्छ भारत मिशन मधील आव्हाने यांचा अभ्यास करुन सदर प्रेरक यांनी दिनांक 31.5.2017 पर्यंत धारणी व चिखलदरा येथील गट विकास अधिकारी यांच्या सल्लाने स्वच्छ भारत मिशनचे काम मोठया प्रमाणात शिल्लक असलेल्या गावांमध्ये मुक्कामी राहणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने प्रेरक यांनी धारणी तालुक्यातील 5 गांवे व चिखलदरा तालुक्यातील 5 गांवाची निवड संबंधित गट विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करावी. आणि अशाप्रकारे एकूण 10 गांवामध्ये मुक्काम करुन स्वच्छ भारत मिशनच्या कामातील अडचणी, आव्हाने समजून घ्यावीत. सदर मुक्कामाचा गावनिहाय अहवाल पुढील मुद्यांवर मला दिनांक 1 जून, 2017 रोजी लेखी स्वरुपात सादर करावा. अहवालातील मुद्ये पुढील प्रमाणे ः

(1) मुक्काम केलेल्या गावांतील शौचालय बांधकामाची सदयस्थिती व शिल्लक उदिष्टे तसेच बांधलेल्या शौचालयाची परिस्थिती.

(2) मुक्काम केलेल्या गावातील शौचालयाची उदिष्टे पूर्ण करण्यामध्ये येत असलेल्या अडचणींची यादी.

(3) त्याबाबतच्या उपाययोजनानिहाय अडचणी आणि सूचना.

यापमाणे मेळघाटातील गावांबाबतचा विशेष अभ्यास प्रेरक यांनी केल्यास त्यांचे पुढील काम अधिक परिणामकारक व चांगले होईल, याबाबत त्यांना आवश्यक ती मदत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता), जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, गट विकास अधिकारी धारणी व चिखलदरा यांनी करावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषद अमरावतीचे संकेतस्थळ www.zpamravati.gov.in वर मुकाअ कार्यालय परिपत्रके यावर उपलब्ध आहे.

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

**प्रत -**

1. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) जिल्हा परिषद अमरावती.
2. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) जिल्हा परिषद अमरावती.
3. गट विकास अधिकारी, पचायत समिती धारणी/चिखलदरा.